**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेत विविध मुद्द्यावरुन गदारोळ दोन्ही सभागृहांचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब
- लोकसभेत आज ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेला संरक्षणमंत्री करणार प्रारंभ
- इंग्लंडबरोबरचा चौथा क्रिकेट कसोटी सामना अनिर्णित / कर्णधार म्हणून पहिल्याच कसोटी मालिकेत चार शतकं झळकावणारा जगातला पहिला फलंदाज ठरला शुभमन गिल
- जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमधे भारताला १२ पदकांची कमाई

**आणि**

- फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आज टायब्रेकरमधे ठरणार विजेती

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्षांनी विविध मुद्द्यांवर गदारोळ केल्यामुळं लोकसभेचं कामकाज आधी बारा, नंतर एक आणि त्यानंतर दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. राज्यसभेतही याच कारणामुळे कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

लोकसभेत दुसऱ्यांदा कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी हौद्यात उतरून वेगवेगळ्या मुद्द्यांवर घोषणाबाजी सुरू केली. लोकसभा सभापती ओम बिर्ला यानी विरोधी पक्षाच्या सदस्यांना शांतता राखण्याचं आवाहन केलं, तसंच समज दिली. मात्र घोषणाबाजी न थांबल्यामुळे सभापतींनी सभागृहाचं कामकाज दुपारी एक वाजेपर्यंत तसंच नंतर दोन वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं.

दरम्यान, आज सभागृहात ऑपरेशन सिंदूरविषयी चर्चा होणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह या चर्चेला सुरुवात करतील.

राज्यसभेचं कामकाज घोषणाबाजीनंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. त्याआधी अण्णा द्रमुकचे एम धनपाल आणि आय एस इंबदुराई यांनी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूरबद्दल चर्चा करावी ही मागणी विरोधी पक्षांनीच केली होती, मात्र आता ते या चर्चेपासून पळ काढत आहेत, असा आरोप संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी केला. लोकसभेत आज या चर्चेला सुरुवात होणार होती, मात्र विरोधकांनी बिहारच्या मतदार यादी पुनरिक्षणाबाबतच्या चर्चेचा मुद्दा पुढे आणला, हे योग्य नाही, असं ते म्हणाले.

<><><><><>

समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांच्याविषयी ऑल इंडिया इमाम असोसिएशनचे अध्यक्ष मौलाना साजीद रशिदी यांनी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करण्यासाठी रालोआ खासदारांनी संसद परिसरात निदर्शनं केली. रशिदी यांचं वक्तव्य महिलांचा अपमान करणारं असून हा अपमान सहन केला जाणार नाही, असं लोक जनशक्ती पक्षाच्या खासदार शांभवी चौदरी म्हणाल्या.

तर इंडिया आघाडीच्या खासदारानी बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षण कार्यक्रमाविरोधात निदर्शनं केली.

<><><><><>

दिल्लीत भटक्या कुत्र्यांनी बालकांवर हल्ले केल्याच्या वृत्ताची स्वतःहून दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने याचिका दाखल करुन घेतली आहे. दिल्लीत भटक्या कुत्र्यांना लस दिली नसल्यामुळे त्यांच्या हल्ल्यामुळे लहान मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांना रेबीजची लागण झाल्याचं वृत्त वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालं होतं. न्यायमूर्ती जे. पारडीवाला आणि न्यायामूर्ती आर महादेवन यांच्या खंडपीठाने या

परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली असून त्यावर तातडीने उपाययोजना करण्य़ाची गरज असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत मँचेस्टर इथला चौथा सामना अनिर्णित राहीला. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड- व्हॉईस कास्ट**

*अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना अनिर्णित राखण्यात काल भारतीय संघाला यश मिळालं. कर्णधार शुभमन गिल, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांची झुंजार शतकं तर के एल राहुलच्या ९० धावा ही डावाची वैशिष्ट्यं ठरली. वॉशिंग्टन सुंदरचं हे कारकिर्दीतलं पहिलं शतक होतं. यजमान संघाच्या ३११ धावांच्या आघाडीला प्रत्युत्तर देताना सामना अनिर्णित ठेवत दुसऱ्या डावात भारताने ४ बाद ४२५ धावा केल्या. यामध्ये जडेजा आणि सुंदर यांची 203 धावांची संयमी भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. कर्णधारपदाची धुरा सांभाळताना पहिल्याच कसोटी मालिकेत चार शतकं झळकावणारा पहिला कर्णधार-फलंदाज हा विक्रम शुभमन गिलने नोंदवला आहे.*

*पाचवा सामना ओव्हल मैदानावर येत्या गुरुवारी सुरु होईल. कर्णधार शुभमन गिल च्या नेतृत्वात भारतीय संघ असा आहे. यशस्वी जायसवाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दूल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, कुलदीप यादव, अंशुल कांबोज, अर्शदीप सिंह, या सामन्यासाठी यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतला विश्रांती देण्यात आली आहे. मँचेस्टरला झालेल्या चौथ्या सामन्यात त्याच्या उजव्या पायाचं हाड मोडल्यामुळे त्याला पाचवा सामना खेळता येणार नाही. त्याच्या ऐवजी तमिळनाडूचा एन जगदीशन याचा समावेश केल्याचं क्रिकेट नियामक मंडळानं काल रात्री जाहीर केलं. मँचेस्टर कसोटीच्या पहिल्या डावात फलंदाजी करताना क्रिस वोक्सच्या गोलंदाजीवर खेळताना चेंडूने जखमी झाल्यानंतर पंत ने दुसऱ्या दिवशी झुंजार खेळी केली होती.*

*पाच सामन्यांच्या या मालिकेतले दोन सामने इंग्लंडने जिंकले असून एक भारताने जिंकला आहे. पाचवा सामना जिंकून बरोबरी साधण्याची संधी भारताला आहे.*

<><><><><>

जर्मनीत झालेल्या एफआयएसयू जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमधे भारतानं एकंदर १२ पदकांची कमाई केली. यात २ सुवर्ण, ५ रौप्य आणि ५ कांस्यपदकांचा समावेश आहे. शेवटच्या दिवशी अंकिता ध्यानी हिनं महिलांच्या तीन हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत रौप्यपदक पटकावलं, तर पुरुषांच्या रिले आणि महिलांच्या रेस वॉक संघांनी दोन कांस्यपदकं भारताला मिळवून दिली. स्पर्धेच्या पदकतालिकेत भारत २०व्या स्थानावर राहिला. जपाननं ३४ पदकांसह पहिलं स्थान मिळवलं, तर अमेरिका २८ सुवर्णपदकांसह दुसऱ्या स्थानी राहिली.

**<><><><><>**

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख यांच्यातील दुसरा डावही काल अनिर्णीत राहिला; त्यामुळं आज होणाऱ्या टाय ब्रेकरमध्ये सामन्याची विजेती ठरेल. हा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी दीड वाजता सुरू होईल.

<><><><>

पंजाबच्या लुधियाना आणि जालंधर इथं काल रात्री झालेल्या दोन वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये ८ जण मृत्युमुखी पडले, तर १९ जणांना वाचवण्यात यश आलं. लुधियाना जिल्ह्यात प्रवाशांना घेऊन जाणारी गाडी सिरहिंद कालव्यात पडल्यामुळे दोन लहान मुलं आणि तीन महिलांसह सहा जण ठार झाले. तर जालंधरच्या स्थानिक रुग्णालयात तांत्रिक बिघाड होऊन प्राणवायूचा पुरवठा बंद पडल्याने तीन रुग्णांचा मृत्यू झाला, तर एकाची अवस्था गंभीर आहे. दरम्यान, राज्याचे आरोग्यमंत्री बलबीर सिंह यांनी या रुग्णालयाला भेट दिली आणि या घटनेची चौकशी करून २४ तासांच्या आत अहवाल सादर करायचे निर्देश दिले.

<><><><>

उत्तरप्रदेशात बाराबंकी इथं औसनेश्वर महादेव मंदिरात चेंगराचेंगरी झाल्यानं दोघांचा मृत्यू झाला तर १७ जण जखमी झाले. श्रावण सोमवार निमित्त दर्शनासाठी जमलेल्या गर्दीवर विजेची तार कोसळून ही दुर्घटना झाली. उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपये देण्याची घोषणा केली.

विजेच्या तारांवर वानराने उडी मारल्यामुळे तारा खाली कोसळल्या. त्यामुळे १९ जणाना विजेचा झटका लागला. जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं आहे.

<><><><>

वीस्लॉ झेपीवस्की स्मृती क्रीडा स्पर्धेत भारताच्या तेजस्विन शंकर यानं डीकॅथलॉन प्रकारात दुसऱ्यांदा नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. पोलंड इथं काल झालेल्या सामन्यात त्यानं ७ हजार ८२६ गुण मिळवले आणि याआधीचा ७ हजार ६६६ गुणांचा स्वतःचाच विक्रम मोडीत काढला. डीकॅथलॉनमध्ये या प्रकारात धावणं, उंच उडी, गोळाफेक, अडथळ्यांची शर्यत अशा दहा प्रकारांचा समावेश असतो.

**<><><><><>**

राजस्थान आणि महाराष्ट्र पोलिसांसह अमली पदार्थ नियंत्रण विभागानं राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील ढोलकिया गावात कृत्रिम अमली पदार्थांच्या निर्मितीत सहभागी असलेल्या आंतरराज्यीय टोळीला उघडकीस आणलं आहे. या संयुक्त कारवाईत टोळीच्या दोन सदस्यांना ताब्यात घेण्यात आलं. या कारवाईदरम्यान अनेक रसायनं आणि मेफेड्रोन कृत्रिम पदार्थ तयार करण्यासाठी उपकरणं आढळली असं एनसीबीनं सांगितलं.

**<><><><><>**

गुजरातच्या अनेक भागात मुसळधार पाऊस पडल्यामुळे खेडा आणि अहमदाबाद सह अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी गांधीनगर इथल्या राज्य आपत्कालीन नियंत्रण केंद्रात बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यात आज सर्वत्र पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**